**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १३ जानेवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्यात महानगरपालिका निवडणूकीच्या प्रचार तोफा थंडावल्या, शेवटच्या दिवशी सर्व पक्षांचा जोरदार प्रचार.**
2. **१२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान आणि ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी.**
3. **१० मिनिटांत डिलिव्हरी सेवा आता बंद, गिग कामगारांच्या सुरक्षिततेला आणि आरोग्याला प्राधान्य.**

**आणि**

4. **मकरसंक्रांतीनिमित्त सुरक्षेच्या कारणास्तव उद्या नागपूर शहरातील १४ उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद.**

**आता सविस्तर बातम्या …….**

प्रचार सभा

राज्यातल्या महापालिका निवडणुकांसाठीच्या प्रचाराच्या तोफा आज संध्याकाळी साडेपाच वाजता थंडावल्या. राज्यातल्या २९ महापालिकांमधल्या ८९३ प्रभागांमधल्या २ हजार ८६९ नगरसेवकांसाठी परवा १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. यासाठी एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहे. सकाळी साडे ७ ते साडे ५ वाजेदरम्यान हे मतदान होणार आहे. प्रचाराचा अखेरचा दिवस असल्यानं सर्व राजकीय पक्षांनी प्रचारावर लक्ष केंद्रीत केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात रोड शो केला . जनतेच्या मनात महायुतीने यापूर्वीच स्थान निर्माण केलं असून महानगरपालिका निवडणुकीत देखील प्रचंड बहुमताने आमचा विजय होईल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. आज सकाळी नागपूरच्या भारत माता चौक इथून त्यांनी रोडशो सुरु केला त्यावेळी ते माध्यम प्रतिनिधींना संबोधित करत होते. यावेळी भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे आणि नागपूरचे शहराध्यक्ष दया शंकर तिवारी देखील उपस्थित होते. तर चंद्रपुरात विविध प्रभागातून रोड शो करीत काँग्रेसने विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वात जोरदार शक्तिप्रदर्शन केलं. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार प्रतिभाताई धानोरकर, आमदार सुधाकर आडबाले, माजीमंत्री वसंत पुरके, माजी आमदार सुभाष धोटे, शहर काँग्रेसचे अध्यक्ष संतोष लहानगे आणि काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी देशासह संपूर्ण राज्यात आणि महानगरपालिकेत भाजपने विकासाच्या नावाखाली फक्त लुटीचे राजकारण केले असल्याची टीका केली. तर भाजपच्या राज्यात महागाई आणि बेरोजगारी वाढली असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली.

जिल्हा परिषदा निवडणूक कार्यक्रम

राज्य निवडणूक आयोगाने राज्यातल्या आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम आज जाहिर केला . त्यानुसार १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ७ फेब्रुवारी रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केली. यामध्ये पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांचा समावेश आहे. या निवडणुकांसाठी १६ ते २१ जानेवारी दरम्यान अर्ज भरता येईल. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल -

***उमेदवारांना ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरावे लागतील. या निवडणुकीत EVM चा वापर होणार असून विधानसभेच्या मतदार यादीत १ जुलै २०२५ रोजी नाव असलेल्या मतदारांना या निवडणुकीत मतदान करता येईल. प्रत्येक मतदाराला जिल्हा परिषदेसाठी १ आणि पंचायत समितीच्या गणासाठी एक अशी दोन मते***

***द्यावी लागतील. या निवडणुकांमध्ये २ कोटी ९ लाख मतदार असतील आणि त्यांच्यासाठी २५ हजार ४८२ मतदान केंद्र कार्यरत असतील. यासाठी १ लाख २८ हजार अधिकारी आणि कर्मचारी काम करतील, असं निवडणूक आयोगाने सांगितलं. जिल्हा परिषदेच्या ७३१ आणि पंचायत समितीच्या १ हजार ४६२ सदस्यांसाठी ही निवडणूक होणार आहे.***

शेयर बाजार बंद

महाराष्ट्रातल्या महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर येत्या पंधरा तारखेला देशातले शेअर बाजार बंद राहणार आहेत. NSE आणि BSE दोन्हीने याबाबत अधिकृत घोषणा करत कॅपिटल मार्केट सेगमेंटमध्ये पूर्ण ट्रेडिंग हॉलिडे जाहीर केला आहे. राज्य सरकारनं २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी सार्वजनिक सुट्टी घोषित केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

अंतिम मतदार यादी

महाराष्ट्र विधानपरिषद शिक्षक मतदारसंघासाठी अकोला जिल्ह्याची अंतिम मतदार यादी आज जिल्हा, उपविभागीय आणि तहसील कार्यालय स्तरावर प्रसिद्ध करण्यात आली. या अंतिम यादीत एकूण ५ हजार ३७९ शिक्षक मतदारांचा समावेश आहे. यापूर्वी ३ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत ४ हजार ८८३ मतदार होते. प्राप्त दावे-हरकतींवर कार्यवाही करून १२ जानेवारी रोजी अंतिम यादी जाहीर करण्यात आली आहे. ही मतदार यादी कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध असून akola.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पात्र शिक्षकांना निरंतर पुनरिक्षण कार्यक्रमाअंतर्गत नाव नोंदणी करण्याची संधी देण्यात आली आहे.

सर्वोच्च न्यायालय

भटक्या कुत्र्यांनी चावा घेतलेल्या व्यक्तींना मोठी नुकसान भरपाई द्यायला लावू असा इशारा सर्वोच्च न्यायालयानं राज्य सरकारांना दिला आहे. गेल्या ५ वर्षात भटक्या प्राण्यांच्या संदर्भात दिलेल्या दिशानिर्देशांची योग्य अंमलबजावणी झाली नसल्याबद्दल न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. भटक्या कुत्र्यांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालणारे नागरिक आणि संस्थांवर सर्वोच्च न्यायालयानं ताशेरे ओढले.

गिग कामगार सुरक्षा

ब्लिंकिट, झेप्टो, स्विगी आणि झोमॅटोच्या गिग कामगारांनी ३१ डिसेम्बरच्या रात्री देशव्यापी संप केला होता त्यावर आज सरकारचा निर्णय आला आहे. सरकारी हस्तक्षेपानंतर, ऑनलाइन ऑर्डरसाठी १० मिनिटांचा डिलिव्हरी नियम रद्द करण्यात आला आहे. कामगार मंत्री मनसुख मांडविया यांच्या हस्तक्षेपानंतर, ब्लिंकिटने त्यांच्या सर्व ब्रँडमधून १० मिनिटांचा डिलिव्हरी दावा काढून टाकला. केंद्रीय मंत्र्यांनी ब्लिंकिट, झेप्टो, स्विगी आणि झोमॅटोच्या अधिकाऱ्यांशी या मुद्द्यावर चर्चा केली. डिलिव्हरी भागीदारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे आणि वेळ मर्यादा काढून टाकणे यावर बैठकीत भर देण्यात आला. जलद डिलिव्हरीच्या दबावामुळे डिलिव्हरी बॉयचा जीव धोक्यात घालू नये, असा स्पष्ट संदेश सरकारने कंपन्यांना दिला आहे. १० मिनिटांची वेळ मर्यादा डिलिव्हरी बॉईजवर जलद डिलिव्हरी करण्यासाठी दबाव आणत होती. त्यामुळे रस्ते अपघात आणि सुरक्षिततेला धोका निर्माण होण्याची भीती होती. ३१ डिसेंबरच्या रात्री गिग कामगारांनी संपावर जाण्याचा निर्णय घेतला होता आणि सरकारला त्यांच्या सुरक्षिततेसाठी पावले उचलण्याचं आवाहन केलं होतं . त्यानंतर, सरकारने कंपन्यांशी बोलणी केली आणि सुरक्षितता प्रथम असल्याचा निर्णय घेतला.

उल्कापात

भंडारा तालुक्यातील परसोडी परिसरात आकाशातून दगडाचे दोन तुकडे पडल्याची घटना समोर आली. १० जानेवारीला सायंकाळच्या सुमारास घडलेला हा प्रकार उल्कापात असू शकतो असं तज्ज्ञांच म्हणण आहे. दोन्ही दगड पोलिस प्रशासनाच्या स्वाधीन करण्यात आले असून, दगडांचे नमुने सखोल तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अभिषेक नामदास यांनी दिलेल्या माहितीनुसार कोलकाता येथील चमू तपासणीसाठी येणार आहेत.

***आमचं जिल्हा नियंत्रण कक्ष या ठिकाणी प्राप्त माहितीनुसार दिनांक दहा जानेवारी रोजी जवाहर नगरच्या जवळ असलेल्या परसोडी  गावामध्ये काही लोक शेकोटी शेकत असताना आकाशातून दोन मोठे निखारे पडताना दिसले. त्याच्यानंतर खूप वेळपर्यंत ते तपत असलेले निखारे त्या ठिकाणी होते. त्याच्यामुळे थोडीशी दहशत माजली होती. त्यानंतर विटेच्या आकाराचे असे दोन ते असल्याचे दिसून आलेले आहेत. त्या अनुषंगाने तातडीने  जवाहर नगर पोलीस स्टेशन मध्ये नागरिकांनी ते सुपूर्द केले आहेत. त्यांना सध्याचे स्थितीमध्ये सिक्युर करून ठेवण्यात आलेलं आहे आणि या अनुषंगाने कलकत्यातील  रिसर्च टीम जिल्ह्याला भेट देणार आहे आणि ती पुढील अभ्यासाकरिता सदरचे दगड घेऊन जाणार आहेत.***

उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद

मकरसंक्रांतीनिमित्त उद्या नागपूर शहरातील १४ उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. कापलेल्या पतंग लुटण्यासाठी मुले रस्त्यांवर धावतात. मांजामुळे उड्डाणपुलांवर अपघात होण्याची शक्यता असते. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी बुधवारी सकाळपासूनच शहरातील १४ उड्डाणपुलांवरील वाहतूक पूर्णतः बंद ठेवली जाणार आहे. सीताबर्डीतील अत्यंत वर्दळीचा आदिवासी गोवारी स्मारक उड्डाणपूल, सोनेगाव विमानतळ ते अजनी चौक, सक्करदरा, दिघोरी, एल. आय. सी. ते साई मंदिर, कामठी रोड, कडबी चौक ते सदर आकार बिल्डिंगकडे जोडणारा उड्डाणपुल, दहीबाजार पूल, मेहंदीबाग, रामझुला, कल्पना टॉकिज चौक ते मानकापूर क्रीडा संकुल, काटोल रोड, मानकापूर, मनीषनगर, वाडी, गांधी नगर कावरापेठ, सातवचन लॉन ते पारडी आणि कळमना मार्केट उड्डाणपूल वाहतुकीसाठी बुधवारी सकाळपासून बंद ठेवले जाणार आहेत. मोटारसायकलसह, सायकल, रिक्षा आणि सर्व प्रकारच्या वाहनांच्या रहदारीसाठी हे उड्डाणपूल सकाळी ६ ते रात्री ८ पर्यंत वाहतुकीसाठी बंद राहतील.

हवामान

विदर्भात आज भंडारा जिल्ह्यात १० अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. यवतमाळ इथं १० पूर्णांक २ अंश , गोंदिया इथं  १० पूर्णांक ४ अंश तर नागपूर इथं 11 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. आगामी 17 जानेवारी पर्यंत हवामान शुष्क  राहणार असल्याचा अंदाज  प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे.

*******